किनगाव जटटू मंडळात ढगफुटी सदृश्य पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान >>पान 2

अतिक्रमणधरकांचा पोलीस कर्मचारी व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर हल्ला; तालुक्यातील माळेगाव येथील घटना >>पान 3

श्रीच्या पालखीचे मराठवाडा विदर्भाच्या हद्दीवर हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये जंगी स्वागत >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
दुसऱ्यांचे दुःख समजून घ्या.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 05 ■ गुरूवार, दि. 24 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



श्रद्धा कपूरही अहान पांडेची फॅन, तिच्या 'सैयारा' सोबत गाठलं थिएटर
आतील पान

# महाराष्ट्रात मतांचा घोळ करून निवडणूक जिंकली

## राहुल गांधींचा पुनरूच्चार, निवडणूक यंत्रणेत फेरफार हेच भारतातील वास्तव

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्रातील निवडणूकांवरून टीकास्त्र डागले आहे. महाराष्ट्रातील निवडणूक भाजपने मतांचा घोळ करून जिंकल्या, असा पुनरूच्चार राहुल गांधींनी केला आहे.मतांमध्ये घोळ कसा केला जातो, याचे पुरावे हाती लागल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच याबाबत निवडणूक आयोगाकडे पुराव्यांसह सादरीकरण करणार असल्याचेही राहुल गांधी यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रात एक कोटी नवीन मतदार दिसून आले. त्यांच्याद्वारे भाजपने मतांचा घोळ करून महाराष्ट्रातील निवडणूक जिंकली. कर्नाटकात आम्ही ही चोरी पकडली आहे. मी तुम्हाला, इलेक्शन कमिशनला हे अगदी ब्लॅक अँड व्हाईट रुपात स्पष्टपणे ही मतचोरी कशी होते ते दाखवून देऊ.

आमच्या हातात पुरावे आहेत. त्यांनाही ते कळून चुकले आहे की ही चोरी आमच्या लक्षात आली आहे. कर्नाटक निवडणुकीतील



अगदी ब्लॅक अँड व्हाईट पुरावे आमच्या हातात आहेत.

आम्ही लोकसभा मतदानावेळचा एक मतदारसंघ निवडला आणि त्यात खोलात जाऊन तपास केला. कारण अडचण अशी आहे की, हे लोक मतदार यादी कागदावर देतात. आणि या यादीचे विश्र्लेषण केले जाऊ शकत नाही. मग एका मतदारसंघातील सर्व मतदार यादी आम्ही घेतली.

त्याला डिजिटल फॉरमॅट करून घेतला. त्यात आम्हाला सहा महिने लागले. पण आम्ही आता यांची सगळी चोरी पकडली आहे. हे कसे केले जाते, कोण मतदान करते, कुठून मतदान होते, कसे नवीन मतदार बनवले जातात, हे सगळं आता आम्हाला कळलं आहे.

आणि आता सरकारलाही ही गोष्ट कळून आली आहे. त्यामुळे आता ते बिहारमध्ये सर्व मतदान यंत्रणा नव्याने करण्याच्या मागे लागले आहेत. जुने मतदार डिलीट करून नव्या पद्धतीने मतदारांची नावे घेतली जात आहेत. नवीन मतदार यादी केली जात आहे. भारतात निवडणूकच चोरली जात आहे. हेच भारताचे वास्तव आहे.

राहुल गांधी यांनी Matchfixing Maharashtra या शीर्षकाने ७ जून २०२५ रोजी लेख लिहिला. त्या लेखात त्यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील निकालावर "matchfixing' चा आरोप केला होता. निवडणूक आयोगाची कार्यपद्धती, मतदार याद्या वाढवून खोटे (fake) मतदार घडवणे, निवडणूकानंतर अचानक लाखो नव्या मतदारांची भरभराट, मतदानाची वेळ संपल्यानंतर झालेले मतदान,

वाढलेली मतदानाची आकडेवारी, प्रलोभनांचा वापर, खोटे मतदान, पुरावे लपवणे, मशिनयोग्य मतदार यादी प्रसारित करू न देणे व मतदानाच्या सीसीटीव्ही फुटेज लपवणे, असे आरोप त्यांनी लेखातून केले होते. मराठी दैनिकातही हा लेख छापून आला होता. दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही वर्तमान पत्रात लेख लिहूनच राहुल गांधींच्या लेखांचा प्रतिवाद केला होता.

# रमी खेळणाऱ्या कोकाटेंचे कृषिखाते जाणार?

**मुंबई /प्रतिनिधी :** विधानसभेत रमी खेळणारे माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषिमंत्री काढून घेण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यांच्याकडील खाते हे मकरंद पाटलांकडे देणार असल्याची माहिती समोर येत आहे. मकरंद पाटील यांच्याकडे सध्या मदत आणि पुनर्वसन खातं असून ते खातं माणिकराव कोकाटे यांच्याकडे सोपवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. विधानसभेत कामकाज सुरू असताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे मोबाईलवर रमी खेळताना दिसून आले होते. त्यावरून आपण यूट्यूबची जाहिरात स्किप करत होतो अशी सारवासारव कोकाटेंनी केली. परंतु त्यावरुन विरोधकांच्या हाती आयतेच कोलित मिळाले आणि सरकारवर टीका झाली.

माणिकराव कोकाटे यांनी काहीही सांगितले तरी सरकारसाठी ते भूषणावह नाही अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली होती. तसेच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही या प्रकरणी उघड नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर कोकाटे यांचे मंत्रिपद काढून घेण्याची चर्चा सुरू झाली. परंतु आपण काहीही चुकीचं केल नाही असं माणिकराव कोकाटे म्हणाले.

माणिकराव कोकाटे यांच्या या प्रकरणामुळे महायुतीच्या नेत्यांमध्ये एक प्रकारची नाराजी असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अजित पवार आणि सुनील तटकरे हे काहीतरी मोठी निर्णय घेणार असल्याची माहिती आहे.

अजित पवार, सुनील तटकरे आणि माणिकराव कोकाटे यांच्यामध्ये बुधवारी एक महत्त्वाची बैठक होणार होती. परंतु अजित पवारांचा मुंबई दौरा रद्द झाल्यामुळे ही बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. मात्र, येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये या बाबतीत मोठा निर्णय होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## येणाऱ्या अधिवेशनात धर्मांतर विरोधी कायदा पारित केला जाईल : भोयर



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** अलीकडच्या काळात धर्मांतरांच्या अनेक घटना जबरदस्तीने होताना पाहायला मिळत आहे. पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती यासाठी तयार करण्यात आली होती. त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. लवकरच येणाऱ्या अधिवेशनात धर्मांतर विरोधी कायदा पारित केला जाईल.अशी माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, अनिल परब हे विरोधी पक्षात असल्याने कारवाईचे आरोप करतात. योगेश कदमच्या नावाने कुठलाही परवाना नाहीये. पण मुख्यमंत्री या सगळ्या संदर्भात योग्य निर्णय घेतील. असे मत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## कल्याण मारहाण प्रकरणात मोठा ट्विस्ट! रिसेप्शनिस्ट मुलीनेच पहिली लगावली कानशिलात

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण /प्रतिनिधी :** कल्याण पूर्व शहरातील नांदिवली भागात एका खाजगी रुग्णालयात मंगळवारी एक धक्कादायक घटना घडली होती. एका रिसेप्शनिस्ट तरुणीला एका परप्रांतील पुरूषाने बेदम मारहाण केली. ही संपूर्ण घटना रुग्णालयात बसवलेल्या सीसीटीव्हीच्या कॅमेऱ्यात कैद झाली. या व्हिडीओमध्ये गोपाळ झा नावाचा व्यक्ती एका मराठी तरुणीला लाथा-बुक्क्यांनी मारहाण करत असल्याचे समोर आले होते. याप्रकरणी गोकुळ झा याच्यासह त्याचा मोठा भाऊ रंजीत झा याला पोलिसांनी अटक करुन आज न्यायालयात हजर केलं होतं. न्यायालयाने दोघांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मात्र आता या प्रकरणात मोठा ट्विस्ट आला आहे. पीडिता असलेली मराठी रिसेप्शनिस्ट तरुणी सोनाली हिने आधी एका महिलेला कानशिलात लगावली होती, असे एक व्हिडिओ फुटेज सध्या समोर आले आहे.

सदर प्रकरणातील नवीन व्हिडीओमध्ये गोकुळ झा, रंजीत झा त्यांची आई आणि सून उभे असल्याचे दिसत आहे. या व्हिडीओमध्ये रिसेप्शनिस्ट तरुणी आणि गोकुळ झा यांच्यात शाब्दिक वाद झाल्याचं पाहायला मिळतंय. यामध्ये गोकुळ झाने तरुणीला पहिली लाथ मारण्याचा प्रयत्न केला. तसेच शिवीगाळही केली.

# परभणी, बीड, लातूर, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा

**मुंबई /प्रतिनिधी :** गेल्या दोन दिवसांपासून राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला असताना आता राज्यात पुढील २४ तास महत्त्वाचे ठरणार आहेत. हवामान विभागाने राज्यभरात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला असून संपूर्ण कोकणासह पुणे, सातारा, कोल्हापूर घाटमाथ्यावर पावसाचे रेड अलर्ट देण्यात आले आहेत. मुंबईला उद्या पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय. पुढील चार दिवस राज्यभरात पावसाचा जोर वाढणार असल्याचं खचऊ ने सांगितलंय.

**हवामान विभागाचा अंदाज काय?**

राज्यात पावसाचं स्वरूप आणखी तीव्र होणार आहे. बंगालच्या उपसागरात पुढील २४ तासांत कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रात विशेषतः कोकण किनारपट्टीपासून विदर्भापर्यंत जोरदार ते अतिजोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

गुरुवार, २४ जुलै २०२५

रेड अलर्ट: रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, मुंबई शहर पुणे, सातारा, कोल्हापूर घाटमाथा

ऑरेंज अलर्ट: ठाणे, पुणे, सातारा

येलो अलर्ट: कोल्हापूर, सांगली, पालघर, नाशिक, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा

शुक्रवार, २५ जुलै २०२५

रेड अलर्ट: रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग

ऑरेंज अलर्ट: ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, नागपूर, भंडारा

येलो अलर्ट:

पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर

शनिवार, २६ जुलै २०२५

ऑरेंज अलर्ट: रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई शहर, नाशिक, पालघर, गडचिरोली

येलो अलर्ट: पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, नागपूर

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये आज (२३ जुलै) दिवसभर मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उद्या म्हणजेच २४ जुलै रोजी पावसाची तीव्रता आणखी वाढणार आहे. या पार्श्र्वभूमीवर मुंबईसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांनी शक्यतो घरातच राहावे, सुरक्षिततेच्या दृष्टीने खबरदारी घेण्याचं आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांमध्ये उद्या अतिवृष्टी होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे हवामान विभागाने या जिल्हयांना रेड अलर्ट जारी केला आहे. आज या तिन्ही जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. काही भागांत १०० मिमीहून अधिक पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे. नदीकाठच्या भागांत पाणीपातळी वाढण्याची शक्यता लक्षात घेता स्थानिक प्रशासन सतर्क आहे.

विदर्भ व मराठवाडयातही पावसाचा जोर वाढणार



असून आज (२३ जुलै) संपूर्ण विदर्भ व मराठवाड्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पूर्वेकडील विदर्भातही आज पावसाचा जोर कायम राहणार असून पुढील चार दिवस विदर्भात तीव्र इशारे देण्यात आले आहेत. मराठवाडा व विदर्भात पावसाचा जोर पुढील चार दिवसांत वाढणार असून पावसाच्या जोरदार सरींची हजेरी लागेल असंही हवामान खात्यानं सांगितलंय.

## प्रफुल लोढाकडे हनी ट्रॅप संदर्भातील पुरावे; एकनाथ खडसे यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** हनी ट्रॅप प्रकरणातील प्रफुल लोढाकडे काही महत्वाची माहिती पुरावे आहेत.ते त्याच्याकडून हस्तगत करता यावे, किंवा ते इतरांना मिळू नये,यासाठी त्याला विविध गुन्ह्यात ताब्यात घेऊन अडकविण्यात येत असल्याचा आरोप ही आमदार एकनाथ खडसे यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे. यावेळी माध्यमांशी बोलताना आमदार एकनाथ खडसे यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. आपल्या संपत्तीची चौकशी



करण्याची मागणी करणाऱ्या मंत्री गिरीश महाजन यांच्या संपत्तीची चौकशी व्हायला पाहिजे, असे मत यावेळी आमदार एकनाथ खडसे यांनी व्यक्त केले.माझ्या संपत्तीची आतापर्यंत पाच वेळा आपल्या सांगण्यावरून चौकशी करण्यात आली. माझ्या काय चौकशा करायच्या त्या करा, पण मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्ये हिंमत असेल तर त्यांनी त्यांच्या संपत्तीची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली.एका सेवा निवृत्त शिक्षकाच्या मुलाच्या कडे एवढी संपत्ती कशी, मंत्री गिरीश महाजन यांचा व्यवसाय आहे.तरी काय असा सवाल ही खडसे यांनी उपस्थित केला आहे.आपल्या मुलाच्या आत्महत्या बाबत त्यांना काय चौकशी करायची ते करू शकतात. माझा मुलगा गेला, त्याच मला दुःख आहे,यांना मुलगा नसल्याने ते यांना कळणार नसल्याचेही एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे.

## महिलेला घरी सोडण्याचे कारण सांगून जंगलात नेऊन तिघांकडून सामूहिक बलात्कार; २ अटकेत, १ फरार

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** भुसावळ तालुक्यातील ग्रामखेडी रोडवर एक धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलीसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले असून एक आरोप फरार झाला आहे.या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.या प्रकरणी भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात तिन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माहिती अशी की पीडित ३५ वर्षीय महिला आपल्या लहान मुलासह रात्रीच्या सुमारास ग्रामखेडी रोडने जात असताना दशरथ गोरेलाल भिलाले, कुंदन गोरेलाल भिलाने आणि शंकर भगवानसिंग भिलाले (तीघेही रा. भुसावळ) यांनी तिला घरी सोडण्याचा बहाणा करत दुचाकीवरून जंगलात नेले. तेथे तिघांनी मिळून तिच्यावर अत्याचार केला. हा प्रकार घडल्यानंतर पीडित महिलेने थेट भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

पीडित महिला आपल्या लहान मुलाला घेऊन ग्रामखेडी रोडने जात असताना तिला संशयित आरोपी दशरथ गोरेलाल भिलाले, कुंदन गोरेलाल भिलाले आणि शंकर भगवानसिंग भिलाले (सर्व रा. भुसावळ) हे भेटले. तिघांनी महिलेला ''घरी सोडतो'' असं सांगून दुचाकीवर बसवले आणि निर्जन जंगलात नेऊन तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला.

**तक्रारीनंतर पोलिसांची तत्काळ कारवाई**

तक्रारीनंतर पोलिसांची तत्काळ कारवाई पीडितेने थेट भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तिसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे.

या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख करत असून, लवकरच फरार आरोपीलाही अटक करण्यात येईल,असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# मोठी बातमी! गुजरात एटीएसकडून अल-कायदाशी संबंधित चार दहशतवाद्यांना अटक

**गांधीनगर/वृत्तसंस्था :** गुजरात एटीएसने अल-कायदाच्या एका मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईदरम्यान चार दहशतवाद्यांना अटक केली आहे. हे दहशतवादी अल-कायदा या दहशतवादी संघटनेशी संलग्न असल्याचे समोर आले आहे. सोशल मीडियाद्वारे ते अल-कायदा या संघटनेशी विचारधारा पेरण्याचे काम करत होते, अशी माहिती एटीएस डीआयजी सुनील जोशी यांनी दिली. या चार दहशतवाद्यांची एटीएसकडून चौकशी केली जात आहे.

एटीएसच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे चौघेही दीर्घकाळापासून अल-कायदा मॉडेलशी जोडलेले होते. ते सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांच्या संपर्कात आले होते. काही गटांमध्येही सक्रिय होते. तपासादरम्यान, एटीएस पथकाला असे आढळून आले की, हे चारही जण गुजरातमध्ये होणाऱ्या संभाव्य दहशतवादी कारवायांबद्दल सतत चर्चा करत होते. याच संदर्भात त्यांना अटक करण्यात आली आहे.



गुजरात एटीएसला त्यांच्या काही सोशल मीडिया हँडल्स आणि चॅट्स देखील सापडले आहेत.

झीशान, फरदीन, सैफुल्ला आणि फारिक अशी या आरोपींची नावे असल्याची माहिती आहे. या अटकेमुळे एक मोठा कट उधळण्यात आला आहे. एटीएसने यातील तीन दहशतवाद्यांना गुजरातमधून तर एका दहशतवाद्याला दुसऱ्या राज्यातून अटक केली आहे. गुजरात एटीएसचे हे मोठे यश मानले जाते. भारतात मोठा घातपात करण्याचा या दहशतवाद्यांचा डाव होता. मात्र हा डाव आता उधळला गेला आहे.

## सच्चे रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर!

मराठी चित्रपट आणि नाट्य सृष्टीतील जेष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचा आज दुसरा स्मृतिदिन. बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे २४ जुलै २०२३ रोजी त्यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले होते. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ रंगभूमीवर आपल्या अभिनयाचे रंग भरणाऱ्या जयंत सावरकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमीची मोठी हानी झाली. त्यांच्या निधनाने रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला. ३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेले जयंत सावरकर हे नोकरीसाठी मुंबईत आले. काही काळ त्यांनी मुंबईत नोकरीही केली मात्र अभिनयाचे बाळकडू पिलेल्या जयंत सावरकर यांचे मन नोकरीत रमले नाही. नोकरी सोडून ते नाटकात काम करू लागले. नोकरी सोडून त्यांनी नाटकात काम करणे हे त्यांच्या सासऱ्यांना आवडले नाही. जयंत सावरकर मात्र अभिनय करण्यावर ठाम राहिले. रंगभूमीवर त्यांना जी भूमिका मिळत गेली ती त्यांनी निष्ठेने पूर्ण केली. सुरवातीचे काही वर्ष तर त्यांनी बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणूनच काम केले मात्र आपल्यालाही आपल्या क्षमतेप्रमाणे नाटकात अभिनय करण्याची संधी मिळेल असा विश्र्वास त्यांना होता याच विश्र्वासाच्या जोरावर त्यांना भूमिका मिळत गेल्या. आपल्याला मिळणाऱ्या भूमिकांची लांबी किती मोठी आहे हे त्यांनी कधीही पाहिले नाही. जयंतराव भूमिकेच्या लांबीपेक्षा भूमिकेची रुंदी पाहत म्हणूनच त्यांना काही नाटकात छोट्या भूमिका मिळाल्या मात्र या छोट्या भूमिकेतही त्यांनी स्वतःच्या अभिनयाची छाप सोडली त्यामुळे लवकरच मराठी रांगभूमिवरील एक प्रख्यात अभिनेते म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे त्यांना अनेक नाटकात मुख्य भूमिका मिळाल्या त्या भूमिकांचे त्यांनी सोने केले. एकच प्याला मधील तळीराम, तुझं आहे तुझ्यापाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतु बर्वा आणि हरितात्या या त्यांनी केलेल्या भूमिका अजरामर ठरल्या. जुन्या काळातील मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते आजच्या काळातील चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम यासारख्या सर्वच दिग्दर्शकांच्या दिग्दर्शनात त्यांनी काम केले. त्यांनी अभिनय केलेले सौजण्याची ऐसीतैशी, टिळक – आगरकर, ययाती – देवयानी, सूर्यास्त ही नाटके खूप गाजली जवळपास १०० हुन अधिक नाटकात भूमिका केलेल्या जयंतरावांनी ३० हुन अधिक मराठी आणि हिंदी चित्रपटात भूमिका केल्या आहेत. दूरचित्रवाणीवरील काही मालिकातही त्यांनी भूमिका केल्या आहे. नाटक, चित्रपट, मालिका अशा तिन्ही ठिकाणी आपल्या अभिनयाचे रंग भरणारे जयंतराव मात्र प्रेक्षकांना भावले ते नातकातच! सहज सोपा अभिनय करून प्रेक्षकांची मने जिंकण्याची त्यांची खासियत होती म्हणूनच त्यांचा अभिनय पाहताना हा माणूस आपल्या घरातीलच एक व्यक्ती असल्याचा भास प्रेक्षकांना होत असे. त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवले आहे. १९९७ साली झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. एक छोटा माणूस या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या निधनाने पाच दशकांहून काळ रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला आहे. जेष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# किनगाव जट्टू मंडळात ढगफुटी सदृश्य पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान

## आमदार मनोज कायंदे यांनी दिले त्वरीत पंचनामे करण्याचे निर्देश

**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**



**बिबी** : दि. २१ जुलैच्या पहाटे ३ ते ४ दरम्यान सिंदखेडराजा मतदार संघातील लोणार तालुक्यातील अनेक गावांमध्ये मुसळधार पाऊस झाला. काही ठिकाणी हा पाऊस ढगफुटी सदृश्य असल्याची नोंद असून त्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार मनोज कायंदे यांनी महसूल प्रशासनाला तातडीने पंचनामे करून नुकसान अहवाल शासनाला सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

बिबखेड, भूमराळा वझर, आघाव, चिखला बीबी, प्रिप्री, खंदारे, सावरगाव तेली, देवानगर, खंडाळा, किनगाव जट्टू इत्यादी गावांमध्ये जोरदार पावसामुळे शेतजमिनी खरडून गेल्या असून, हजारेकऱ्यांवरील कपाशी, सोयाबीन व अन्य पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विहिरी पूर्णपणे जमीनदोस्त झाल्या असून, पाण्याचा स्त्रोत नष्ट झाल्याने येणाऱ्या हंगामात शेती करणे कठीण होणार आहे.

शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढाकार घेत आमदार कायंदे यांनी आज दि. २३ जुलै रोजी संबंधित महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पंचनाम्यांचे काम युद्धपातळीवर सुरू करण्याचे आदेश दिले. त्यांनी प्रशासनाला आदेश दिले की, पंचनामे करताना प्रत्येक शेतकऱ्याचे नुकसान अचूकपणे नोंदवावे व अहवाल त्वरित जिल्हाधिकारी कार्यालय व राज्य शासनाला सादर करावा, जेणेकरून पीडित शेतकऱ्यांना योग्य त्या आर्थिक मदतीस पात्र ठरता येईल.

''शेतकऱ्याच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत. शासनदरबारी त्यांच्या हक्काचे न्याय मिळवून देण्यासाठी माझ्या स्तरावरून संपूर्ण प्रयत्न केला जाईल,'' असे आश्वासनही आमदार कायंदे यांनी दिले.

दरम्यान, स्थानिक प्रशासनानेही तातडीने टीम तयार करून विविध गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी सुरू केली असून, येत्या काही दिवसांत संपूर्ण नुकसान शासनाकडे सादर करण्यात येईल, अशी माहिती महसूल विभागाकडून मिळाली आहे.

ही नैसर्गिक आपत्ती लक्षात घेता शासनाने देखील तातडीने मदतीचे प्रस्ताव तयार करून पीडित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मुंबईत पावसाची बॅटिंग सुरूच; पुढील चार दिवस कोकणात 'ऑरेंज अलर्ट' जारी!

**मुंबई/प्रतिनिधी** : येत्या काही दिवसांत मुंबईत मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. तसंच मुंबईकरांनी सतर्क राहण्याचे आवाहन देखील हवामान विभागाने केले आहे. जून महिन्यात झालेल्या पावसानंतर जुलैच्या महिन्यातील पहिले २० दिवस मुंबईकरांना उकाड्याचा सामना करावा लागला. आता मुंबईत रविवारी रात्रीपासून सुरू झालेला मुसळधार पाऊस अद्यापही सुरू असून, मुंबईकरांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे.

हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, पुढील चार दिवस मुंबईसह कोकणात 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला असून, आज (२३ जुलै) आणि उद्या (२४ जुलै) गुरुवारी मुंबईसह कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईत वातावरण ढगाळ राहणार असून, मुसळधार पावसाची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ४०–५० किमी असू शकतो, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. तर, दुसरीकडे मुंबई उपनगरात आज सकाळपासूनच मुसळधार पाऊस सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे.

मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''मान्सून वारे पुन्हा एकदा सक्रिय झाले असून, आता वातावरणातील परिस्थितीही पावसासाठी अनुकूल आहे. वातावरणातील आर्द्रता वाढली असल्यानं आणि वाऱ्यांचा वेगही वाढण्याची शक्यता आहे. तसंच वातावरणातील या स्थितीमुळं २७ जुलैपर्यंत राज्यात मुसळधार पावसाची शक्यता आहे,'' असं शुभांगी भुते यांनी म्हटलं आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीनही जिल्ह्यांसाठी शुक्रवारपर्यंत 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला असून, उत्तर कोकणात म्हणजेच पालघर, ठाणे आणि मुंबई या भागात पावसाचा जोर या तीन जिल्ह्यांच्या तुलनेत काहीसा कमी असेल,

# श्रद्धा कपूरही अहान पांडेची फॅन, तिच्या 'सैयारा'सोबत गाठलं थिएटर

**मुंबई/प्रतिनिधी** : सैयारा या सिनेमाच्या निमित्तानं बॉलिवूडमध्ये अनेक वर्षांनी रोमँटिक सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला. या सिनेमाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. सिनेमा पाहण्यासाठी प्रेक्षक थिएटरमध्ये गर्दी करत आहेत. याचा फायदा सिनेमाच्या कमाईवर झाला. सिनेमानं अवघ्या पाच दिवसात तब्बल १०० हून अधिक कमाई केली आहे. विशेषत: तरुणाई हा सिनेमा पाहण्यासाठी थिएटरमध्ये गर्दी आहे. या गर्दीत अभिनेत्री श्रद्धा कपूर देखील दिसली आहे. सैयारा पाहायला गेलेल्या श्रद्धाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतोय.

'सैयारा' सिनेमातून अहान पांडेने आपल्या अभिनय प्रवासाची सुरुवात केली आहे आणि चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे. सिनेमाची सर्वत्र इतकी चर्चा सुरू आहे की अभिनेत्री श्रद्धा कपूर देखील हा सिनेमा पाहण्यापासून स्वत: रोखू शकली नाही. श्रद्धा तिच्या सैयाराबरोबर म्हणजेत तिच्या कथित बॉयफ्रेंडबरोबर सिनेमा पाहण्यासाठी गेली होती.

# संत नामदेव महाराज मंदिराचा जीर्णोद्धार करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** समाजातल्या शेवटच्या व्यक्तीला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणाऱ्या आणि भागवत धर्माचा विचार आपल्या लेखणी व वाणीने देशभर पोहोचविणाऱ्या संत नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येईल. संत नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी वैश्र्विक दर्जाचे स्मारक उभारतांना निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यांचे विचार हे त्यांचे खरे स्मारक असून हे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंढरपूर येथे आयोजित श्री संत शिरोमणी नामदेव महाराज, परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठ शतकोत्तर संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, श्री नामदेव क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुरु गोविंदसिंग, संत कबीर यांनी संत नामदेवांचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे. मीराबाई, नरसी मेहता यांच्या काव्यातदेखील नामदेव महाराजांचे विचार पहायला मिळतात. भारताच्या सर्व दिशांना जोडण्याचे आणि खऱ्या अर्थाने भागवत धर्मातील विचार वैश्र्विक करण्याचे कार्य त्यांनी केले. सामाजिक समरसतेचे वस्त्र विणण्याचे, संपूर्ण व्यवस्था बदलण्याचे आणि समाजाला एकतेचे मूल्य देण्याचे कार्य नामदेव महाराजांनी केले. संत कबीर, दादू, गरीबदास यांनी विचारांची प्रेरणा संत नामदेवांकडून घेतली. आपल्या संतभूमीत अभंगांच्या माध्यमातून संतांचा हा विचार आपल्यापर्यंत पोहोचला आहे.

**भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे संत नामदेवांचे महान कार्य**

संत नामदेव महाराजांनी देशातील २२ राज्यात भ्रमण करून भागवत धर्माचा विचार पोहोचविला. परकीय आक्रमणाच्यावेळी समाजात श्रद्धा निर्माण करण्याचे आणि समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. संत ज्ञानेश्र्वर महाराजांनी भगवद्गीतेची गंगा मराठीत आणली, त्याला नामदेव महाराजांच्या तत्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले. या दोघा संतांची भेट वारकरी संप्रदायात अमूल्य विचारांचा संगम म्हणून पाहिले जाते.

संत नामदेव केवळ वारकरी नव्हते, तर भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेचे पाईक होते. त्यांनी भाषेचे बंधन झुगारले, सीमांची कुंपणे तोडली आणि भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे कार्य केले. आपल्या ऐतिहासिक यात्रेचा समारोप पंढरपूरला करतांना स्नेहभोजनात सर्वांना एकत्र करून संपूर्ण समाजाला एक करण्याचे कार्य केले. विठ्ठल मंदिरात चोखोबांची समाधी उभी करून व्यक्ती जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो हा संदेश दिला.

**हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे महान कार्य**

संत नामदेवांनी संत ज्ञानेश्र्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे हृदयद्रावक दृष्य वर्णन केले. त्यांनी पुंडलिकांपासून जनाबाईपर्यंत भक्तांची चरित्रेदेखील लिहिली. आपल्या इतिहासातले पहिले चरित्रलेखक संत नामदेव महाराज होते. त्यांच्या साहित्यात संवाद आहे, नाट्य आहे, अखिल मानवेतेचा विचार करून



निर्माण केलेले हे साहित्य आहे. श्रीकृष्णाच्या लीला मराठीत सांगतांना त्यांनी बालकविताही लिहिल्या आहे.

मराठी गजल काव्य प्रकाराचे मूळही संत नामदेवांपर्यंत पोहोचते. सर्व साहित्याची निर्मिती करतांना हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी हिंदी आणि पंजाबीत अभंग लिहिले. ब्रज भाषा आणि शौरसेनी भाषा त्यांना अवगत होत्या. भाषा हे संवादाचे साधन आहे, विवादाचे नाही, हे त्यांनी दाखवून दिले. भाषा ही मैत्री आणि बंधुत्वाचा धागा आहे हे त्यांनी जाणून घेतले होते. म्हणून शीख धर्मात सर्वोच्च स्थानी असलेल्या गुरू ग्रंथसाहीबमध्ये ६१ पदे संत नामदेवांची आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**नामदेव पायरीचे दर्शन हा भाग्याचा क्षण**

संत नामदेव महाराजांच्या ६७५ व्या संजीवन समाधीच्या निमित्ताने नामदेव पायरीचे दर्शन घेणे आणि तिथली ऊर्जा प्राप्त करून घेणे हा भाग्याचा दिवस असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, या पायरीच्या दर्शनाने प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घेतल्याचे पुण्य मिळते. नामदेव महाराजांच्या अभंगात 'पायरिचे चिरे' असा उल्लेख आहे, त्यानी याच भावनेने आपले कार्य केले. भागवत धर्माचा विचार हा वैश्र्विक विचार आहे, तो देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचे कार्य नामदेव महाराजांनी केले. मराठ्यांनी हिंदवी स्वराज्य अटकेपार नेले, परंतु त्यापूर्वी नामदेव महाराजांनी भागवत धर्माचा विचार तिथपर्यंत पोहोचविला. त्यांच्या कुटुंबानेदेखील विठुमाऊलीचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचविले, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**संत नामदेव महाराजांच्या समाधी स्थळाचा आणि मंदिर परिसराच्या विकासासाठी प्रयत्नशील – पालकमंत्री जयकुमार गोरे**

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, देशाची संस्कृती जपणे, वृद्धींगत करणे, संतांच्या विचाराचा प्रसार होणे, आपली प्रेरणास्थळे बळकट करण्यासाठी शासन कार्य करीत आहे. पंढरपूरचा विकास होऊन भव्य कॉरीडॉरची निर्मिती करण्यासाठी नागरिकांना विश्र्वासात घेण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न आहे. नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी भव्य स्मारक पंढरपूर येथे उभे रहावे आणि संत नामदेव महाराज मंदिर परिसराच्या विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे.

संत शिरोमणी सावता महाराजांच्या स्मारकासाठी १५० कोटींचा निधी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने नुकताच घेतल्याचे त्यांनी सांगितले. संत नामदेव महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी सर्वांनी एकत्रित यावे असे आवाहन पालकमंत्री श्री.गोरे यांनी केले.

यावेळी ह.भ.प. ज्ञानेश्र्वर महाराज नामदास व आचार्य तुषार भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी सरसंघचालक मोहन भागवत यांनी या कार्यक्रमासाठी दिलेला शुभेच्छा संदेश प्रदर्शित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांच्या परिवारातील त्यांचे वंशज हरिभक्त परायण ज्ञानेश्र्वर महाराज नामदास व अन्य संतांचे पूजन केले. त्यानंतर श्री संत नामदेव महाराज यांच्या संपूर्ण कार्याची माहिती व महिमा लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष संकेतस्थळांचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, तसेच या संजीवन सोहळ्यानिमित्त तयार करण्यात आलेल्या चांदीच्या विशेष नाण्याचे विमोचनही करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री नामदेव क्षत्रिय एकसंघचे राष्ट्रीय अध्यक्ष महेश ढवळे यांनी केले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राजेंद्र राऊत, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आचार्य तुषार भोसले, अभिनेता गोविंदजी नामदेव, ह.भ.प. केशव महाराज नामदास, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, सचिव रुपेश खांडके व अन्य मान्यवर उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अतिक्रमणधारकांचा पोलीस कर्मचारी व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर हल्ला; तालुक्यातील माळेगाव येथील घटना



दैनिक आपला विदर्भ

**मोताळा/प्रतिनिधी :** तालुक्यातील माळेगाव येथे वन विभागाच्या शेकडे एकर जमिनीवर अनेक वर्षांपासून अतिक्रमणधारकांनी ताबा केला आहे. ते अतिक्रमण काढण्यासाठी २३ जुलै रोजी वनविभाग व पोलिसांच्या वतीने कारवाई केली जात असताना अतिक्रमणधारकांनी पोलीस व वन विभागाच्या कर्मचाऱ्यावर हल्ला चढवला. या हल्ल्यात तब्बल १७ जण जखमी झाली असल्याची माहिती आहे.

तालुक्यातील माळेगाव येथे वन विभागाचे शेकडो एकर जमीन आहे. त्या जमिनीवर अतिक्रमणधारकांनी गत दहा ते पंधरा वर्षांपासून अतिक्रमण केले आहे. सदर अतिक्रमणाबाबत वरिष्ठ विभागगाकडून सूचना प्राप्त झाल्याने मोताळा येथील पोलीस स्टेशनचे कर्मचारी व वन विभागाची टीम वरिष्ठ अधिकारी असे घटनास्थळावर दाखल झाले. वनविभागाच्या वतीने अतिक्रमण हटविण्याबाबत संबंधीत विभागांना सुचना केल्या होत्या. अतिक्रमण हटाव मोहिम राबविण्यासाठी गेलेल्या पथकावर अतिक्रमणधारकांनी हल्ला चढवल्याने सतरा पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. अशी माहिती सूत्राकडून मिळाली आहे. सदर जखमेमध्ये १२ कर्मचाऱ्यांनी जास्त मार असल्याची सुद्धा माहिती आहे.

### अतिक्रमण धारकाच्या हल्ल्यात कर्मचारी जखमी

बुलढाण्याच्या मोताळा तालुक्यातील माळेगाव येथे गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून शेकडो एकर जमिनीवर आदिवासी बांधवांनी अतिक्रमण केले होते. अतिक्रमण निष्कासनाच्या कारवाईसाठी गेलेल्या पोलिस आणि वन विभागाच्या कर्मचाऱ्यावर तुफान दगडफेक, करण्यात आली. मिरची पूड फेकली आणि कोयत्याणे हल्ला करण्यात आला. त्यामुळे मोठी तणावाची परिस्थिती सध्या माळेगावमध्ये निर्माण झाली आहे. अशी वन परिक्षेत्र अधिकारी अभिजीत ठाकरे यांनी दिली आहे.तसेच यावेळी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांवर त्यांनी सकारात्मक माहिती दिली.

## ओबीसी मुलींच्या वसतिगृहात शिरुन मुलीचा विनयभंग नागपूर येथील सरकारी वसतीगृहातील धक्कादायक प्रकार

**नागपूर/प्रतिनिधी :** येथील सरकारी ओबीसी मुलींच्या वसतिगृहात शिरुन मुलीचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार २२ जुलैला रात्री तीन वाजता नागपूर येथील सरकारी ओबीसी मुलींच्या वस्तीगृहाच्या दाराची कडी काढून दोन आरोपी आत शिरले होते.वसतीगृहात ना सीसीटीव्ही, नाही पुरेसी सुरक्षा यंत्रणा. सदर ओबीसी वस्तीगृहात ६४ मुली राहतात. मुलींच्या वसतीगृहात दोन आरोपी शिरले होते. मुलींचा मोबाईल घेऊनंही गेले होते. एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र आरोपींना अद्याप अटक करण्यात आली नाही. अशी माहिती एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पी.आय.गोकुल महाजन यांनी दिली.

## रिसोड शिवसेना तालुका प्रमुख पदी मच्छिंद्र पाटील ढोणे यांची नियुक्ती



दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना रिसोड तालुका प्रमुख म्हणून मच्छिंद्र पाटील ढोणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना नेत्या तथा आमदार भावनाताई गवळी व शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे यांनी शिवसेना तालुकाप्रमुख मच्छिंद्र पाटील ढोणे यांची नियुक्ती केली आहे या प्रसंगी शिवसेना जिल्हा संघटक अनिल गरकळ , शिवसेना तालुका संघटक अमोल भाऊ नरवाडे, निवासी जिल्हा प्रमुख भागवतराव गवळी रिसोड शिवसेना शहरप्रमुख अरुण मगर माजी नगरसेवक कपिल कदम संतोष हे उपस्थित होते हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मविर आनंद दिघे यांची शिकवण याचा आपण सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल, तसेच समाजातील विविध घटकांचेप्रश्न सोडविण्यासाठी आपली मदत होईल आणि शिवसेना पक्ष वाढीसाठी शिवसेना नेत्या तथा आ.भावनाताई गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांना सोबत घेऊन समन्वय साधनार असा विश्वास नवनिर्वाचित शिवसेना तालुकाप्रमुख नवनिर्वाचित तालुकाप्रमुख मच्छिंद्र पाटील ढोणे यांनी व्यक्त केला शिवसेना तालुकाप्रमुख मच्छिंद्र ढोणे हे गेल्या पंचवीस वर्षापासून शिवसेने मध्ये सक्रिय आहेत सर्वप्रथम वाशिम जिल्ह्याचे शिल्पकार स्वर्गीय माजी खासदार पुंडलिकराव गवळी यांच्या नेतृत्वात शिवसेनेत प्रवेश केला होता विद्यार्थी सेना उपजिल्हाप्रमुख व त्या नंतर शिवसेना उपजिल्हाप्रमुख म्हणून त्यांनी काम केले आहे ढोणे यांच्या नियुक्तीने रिसोड तालुक्यात शिवसेनेमध्ये नवचैतन्य निर्माण झाला आहे त्यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे या प्रसंगी जगन्नाथ पाटील बिल्लारी दत्तराव अण्णा मापारी गजानन रावजी गव्हाणे प्रभाकर रंजवी बबनराव टाले विष्णू नाना सरकटे बालाजी बिल्लारी सुभाषराव सदार उत्तमराव गिते सुदाम झरी विठ्ठलराव नरवाडे देवानंद नरवाडे संतोष ढोणे गजानन सदार लक्ष्मण मागे माणिकराव खरात रामेश्वर राऊत अरुण भोपाळे यांच्यासह शिवसेना कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## २२ वर्षीय तरुणाचा दोन मुलांच्या आईवर जीव जडला, महिलेच्या नवऱ्याची तरुणाने केली निर्घृण हत्या



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील वाशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक घटना उघडकीस आली असून, पदवीच्या पहिल्या वर्षात शिकणाऱ्या २२ वर्षीय एका मुलाने प्रेम प्रकरणातून प्रेयसीच्या नवऱ्याच्या डोक्यात फावडा घालून निर्घृण खून केला.

मागील अडीच वर्षांपासून २ मुले असलेल्या एका विवाहित महिलेचे एका पदवीच्या पहिल्या वर्षात शिकणाऱ्या मुलासोबत प्रेम संबंध होते. याबाबतची माहिती तिच्या पतीला समजताचं त्याने तिला समजावण्याचा प्रयत्न केला. यावरून त्यांच्यात अनेकवेळा भांडणही झाले. मात्र, तरीही पत्नीचे अनैतिक संबंध सुरूचं राहिल्याने पती थेट तिच्या प्रियकराच्या घरी गेला. काल रात्री पती प्रियकराच्या घरी जाऊन तुझे माझ्या पत्नीसोबत काय संबंध आहेत सांग, अनेकांनी तुमच्याबद्दल आम्हाला सांगितले आहे.

यावरून त्यांच्यात वाद सुरू झाला. वाद इतका टोकाला गेला की, आरोपीने घरातील फावडा डोक्यात घालून त्यानंतर मेल्याची खातरजमा करण्यासाठी गळा आवळून खून केला. त्यानंतर आरोपीने मयत व्यक्तीला नवी मुंबईतील वाशी खाडी किनारी नेऊन फेकले. मृतदेह पोलिसांना मिळताच पोलिसांनी तपास सुरू केला आणि विचित्र प्रेम प्रकरणाचा खुलासा झाला आणि पोलिसही अचंबित झाले.

मिळालेल्या माहितीनुसार मुलाने महिलेला लग्नाचीही मागणी घातली होती. यावेळी महिलेने लग्नास नकार दिल्याने तो ही राग आरोपीच्या मनात असल्याने रागाच्या भरात आरोपीने महिलेच्या पतीला ठार केले. तर संशय येऊ नये म्हणून मारून मृतदेह चिखलात गाडून प्रेयसीला फोन करून तुझा नवरा घरी येणार नसल्याचेही सांगितले. मूळ कोलकाताचा रहिवाशी असलेला २२ वर्षीय आरोपी अमीनुर आली मौला याला अटक करून सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, घटनेचा अधिक तपास वाशी पोलीस करत आहेत.

## संक्षिप्त...

### राज्यपालांना राजकीय वादात ओढणे चुकीचे आहे - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** राज्यपाल हे संवैधानिक आहेत. राज्यपालांना कोणत्याही राजकीय वादात ओढणे चुकीची आहे. असे स्पष्ट मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पंढरपुरात व्यक्त केले. मराठी भाषेवरून राज्यात वाद सुरू आहे या वादामध्ये राज्यपालांनी उडी घेतली होती. त्यानंतर आता मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना राजकीय वादात ओढणे चुकीचे आहे. राज्यपाल बोलतात ते योग्यच बोलतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळ्यासाठी पंढरपुरात आले आहेत. यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना राज्यपालांच्या वक्तव्यावर मत व्यक्त केले. पंढरपुरात विकास आराखडा तयार केला जाणार आहे. पंढरपूरचा विकास करणे म्हणजे चोरी नाही. कोणतीही गोष्ट लपून-छपून केली जाणार नाही. संदर्भात जे बाधित होणार आहेत. त्यांच्याशी मी चर्चा करायला तयार आहे. परंतु कोणत्या पुढाऱ्यांशी चर्चा करण्याची गरज नसल्याचे यावेळी त्यांनी स्पष्ट केले.

### नांदगावला शिवसेना ठाकरे गट आक्रमक; ज्वलंत प्रश्नांवर वेधले प्रशासनाचे लक्ष



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकच्या नांदगावमध्ये गिरणा धरण ५६ खेडी योजना जलवाहिन्यांमधून पाणी गळती, रेल्वे अंडरपासमध्ये वर्षभर साचणाऱ्या पाण्यासह विविध नागरी समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाच्यावतीने मोर्चा काढून जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. अंडरपासचा रस्ता मोकळा, झेलम, शालिमार, सचखंड, सेवाग्राम व बडनेरा एक्सप्रेस हा रेल्वे गाड्यांना नांदगाव व न्यायडोंगरी स्थानकांवर थांबा द्यावा. येवला रोडवर पादचारी पूल उभारावा उबाठा कार्यालयावर झालेल्या बेकायदेशीर कब्ज्याची चौकशी करावी आदी मागणी यावेळी करण्यात आली.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी चे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** माझ्या जन्मदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या त्याला तेवढ्याच अर्थाने बघितले पाहिजे. आम्ही एकमेकांचे राजकीय विरोधक आहोत, वैरी नाही. माझ्या जन्मदिवसाच्या निमित्ताने त्या शुभेच्छा होत्या, त्याला चुकीचा अर्थ काढू नये. अन्यथा आपण कुठल्यातरी चुकीच्या संस्कृतीला पुढे नेत आहोत असे होईल.

### ग्राहक विभागातर्फे तीन लाख टन कांदा खरेदी होणार; पणन मंत्री जयकुमार रावल यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर कांद्याचे उत्पादन घेतले जाते या पार्श्वभूमीवर ग्राहक विभागातर्फे जवळपास तीन लाख टन कांदा खरेदी करण्यात येणार आहे. कांद्याची ही खरेदी बाजार समिती करण्याबाबत आपण सांगितले असून जनतेतून खरेदी झाल्यास चांगला भाव मिळेल या उद्देशाने ही खरेदी पारदर्शकपणे देखील करण्यात येणार आहे. यात चुकीचे काही झाल्यास कठोर करावाई करण्यात येईल अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी यावेळी दिली.

# सरकारचा धाक राहिला नाही


## प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांची पत्रकार परिषदेत सरकारवर टीका

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** सरकारचा धाक राहिला नाही. प्रशासन, सरकार सांगेल तसे काम करत आहे. कोणाला सोडायचे, आत टाकायचे हे सरकार ठरवते. अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी पुणे येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. यावेळी ते पुढे म्हणाले की, पक्षाची जबाबदारी भेटल्यानंतर राज्यातील पदाधिकारी बैठक बोलावली आहे. पक्ष मजबूत करण्यासाठी चर्चा करत आहोत.

अडचणी सुचना ऐकून पक्ष मजबुत करण्याचे काम करत आहोत.भाषेवर उद्योजक येतात अस वाटत नाही, भाषेशी उद्योग धंद्याचा काही संबंध नाही. माणिकराव कोकाटे चुकीचे काय बोलले नाहीत, त्यांनी सांगितले सरकारकडे काही पैसेच नाहीत. सरकार कर्जबाजरी झाले आहे. कोकाटे यांनी राजीनामा द्यावयासाठी आंदोलन होत आहेत. राज्यसरकार टिकवण्यासाठी हे सगळं चालल आहे. का? अस वाटत आहे.

मंत्र्यांनी काही केले, तर फक्त खाती बदलायचा हा नवीन पायंडा येत आहे. विरोधक जनता राजनामाची मागणी करत असेल, तर मंत्र्याचे खात बदलण्याचा पॉईंट शोधला असेल, तर हे नवीन संशोधन पाहायला मिळते.पहिलीपासून हिंदी लादण्याचा विषय होता. राज्य सरकार ने जो जीआर काढला होता. आता केंद्र ने वेगळा जीआर काढला, राज्य सरकार चुकीचा निर्णय लादत होत.तीन पक्षाच्या सरकारमध्ये स्पर्धा सुरू आहेत. म्हणून मुख्यमंत्र्यांनी लक्ष घातले आहे. देवेंद्र फडणवीस यांना चांगले काम करायचे असेल, तर काही कटू निर्णय घ्यावे लागतील. मुख्यमंत्री जर निर्णय घेत नसतील, तर, त्यांनाच निर्णय घेण्याचा अधिकार आहे का? प्रश्न आहे. आता लाडकी बहिणीला



एवढे निकष लावून चाळण लावले जात आहेत. त्यांची संख्या कमी होईल याचे सरकार आता बघत आहे. आता सगळे लाभ शोधले जात आहेत, योजना बंद होणार नाही. पण बंद होण्यासाठी जेवढे नियम लागतील तेवढे लावतील.

महादेव मुंडे प्रकरणात सरकारने निःपक्षपातीपणे चौकशी करावी, सरकारने त्या भगिनीचा अंत पाहू नये. पक्ष विलीनीकरणाबाबत कुठलीही चर्चा खाजगीत झाली नाही. मी पक्ष वाढवण्याबाबत चर्चा करायला आलो आहे. विरोधी पक्ष नेता सरकार निवडत नाही. महाविकास आघाडी म्हणून बसू. त्या नंतर निर्णय होईल, पण लोकशाही आहे कुठे सरकारला विरोधी पक्षनेता नको आहे.असे मत यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शिक्षकांची शिंदे यांनी व्यक्त केले.

# श्रीच्या पालखीचे मराठवाडा विदर्भाच्या हद्दीवर हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये जंगी स्वागत

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप






**बुलढाणा :** श्रीच्या पालखीचे मराठवाडा विदर्भाच्या हद्दीवर हजारो भक्तांच्या उपस्थितीमध्ये जंगी स्वागत करण्यात आले. विदर्भाच्या हद्दीमध्ये पालखीचे आगमन होताच फटाक्याचे आतषबाजी, रांगोळी,पुष्पदृष्टी करत श्री च्या पालखीचे व सोबत असणाऱ्या वारकऱ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.श्री च्या पालखीसोबत ७०० वारकरी सहभागी आहे.गण गण गणात बोते विठ्ठल नामाचा जयघोष करत वारकरी व हजारो भक्त दंग होऊन गेल्याचे पाहायला मिळाले.

विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या श्री क्षेत्र शेगांव येथील श्री संत गजानन महाराज यांची पालखी दरवर्षी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला मार्गस्थ होत असते,श्री ची पालखी सध्या परतीच्या मार्गावर असून पालखीचे जिल्ह्याच्या हद्दीमध्ये दुपारी २ वाजेच्या दरम्यान आगमन झाले.

यावेळी आमदार मनोज कायंदे,राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष ॲड नाझेर काजी, माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे,विष्णु मेहेत्रे,अतिश तायडे,सतीश तायडे,माजी जिल्हा परिषद अध्यक्षा नंदाताई कायंदे,वर्षा कायंदे,शेख यासीन,सिद्धार्थ जाधव, वैभव मिनासे,सिताराम चौधरी,सतिश काळे,जगन सहाने, उमेश खरात, सागर मेहेत्रे,शाम मेहेत्रे,राजेंद्र अंभोरे, उपविभागीय पोलिस अधिकारी मनिषा कदम,पोलिस निरीक्षक आशिष इंगळे,नायब तहसीलदार प्रांजल पवार,पोलीस उपनिरीक्षक बालाजी सानप,श्रावण डोंगरे, महसूलचे कर्मचारी यांच्यासह विविध मान्यवर यांच्यासह हजारो भाविकांची उपस्थिती होती. स्थानिक नगर परिषदेच्या वतीने जल शुद्धीकरण केंद्राजवळ दिंडी सोहळ्याचे उत्साहात स्वागत करण्यात आले.यावेळी मुख्याधिकारी तथा प्रशासक आशिष बोबडे,भाजपा प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ,भाजपा प्रदेश ओबीसी सेलचे उपाध्यक्ष डॉ.सुनील कायंदे,विजय तायडे, श्रीनिवास खेडेकर,बालाजी मेहेत्रे,संदीप मेहेत्रे,अजीम पठाण, राजू देशमुख,सतीश वाकडे,नितीन सुतार,प्रभाकर वाघ यांच्यासह सर्व विभाग प्रमुख कर्मचारी उपस्थित होते.याच ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते विजय तायडे यांनी दिंडीतील वारकऱ्यांना फराळाचे वाटप केले. मराठवाडा विदर्भाच्या हद्दीपासून शेकडो भाविक पायदळ शहरापर्यंत दिंडी सोबत दाखल झाले होते. ठिकठिकाणी श्री च्या पालखीचे मोठ्या उत्साहामध्ये स्वागत करण्यात आले.शहरातील रामेश्वर मंदिरामध्ये श्री च्या पालखीसोबत असणाऱ्या वारकऱ्यांची व भक्तांची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती, पालखी मधील वारकऱ्यांचे भोजन झाल्यानंतर काळाकोट मार्ग तहसील कार्यालयासमोरून जिजामाता विद्यालयांमध्ये पालखी मुक्कामासाठी थांबली होती. जिजामाता विद्यालयांमध्ये पालखीचे आगमन होताच हजारो भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार आशिष इंगळे,पोलीस उपनिरीक्षक बालाजी सानप,श्रावण डोंगरे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.ता.२४ जुलै रोजी सकाळी श्री ची पालखी किनगांव राजासाठी प्रस्थान करणार आहे.

## विविध वृत्त...

### धुळ्यात जुगार अड्ड्यांवर पोलिसांची धडक कारवाई; सहा जणांना अटक







दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरातील अवैध जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पोलीस उपअधीक्षक सागर देशमुख यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही धडक मोहीम राबवली. शहरातील राजकमल टॉकीज, पितांबर चौक परिसरातील दोन ठिकाणी आणि राजमाता शाळेजवळ एकाच वेळी छापे टाकण्यात आले. या कारवाईत सहा जणांना अटक करण्यात आली असून, ५० हजारांपेक्षा जास्त रोख रक्कम, ८ मोबाईल फोन आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, पोलिसांनी जप्त केलेले ४०० हून अधिक पत्त्यांचे बॉक्स आणि आकडेवारीच्या डायऱ्या जागीच जाळून नष्ट केल्या.

### जागतिक दर्जाच्या लोणार सरोवराची चार फुटाने वाढली पाणी पातळी, परिसरातील सांडपाणी सरोवरांमध्ये जात असल्याने जैवविविधता धोक्यात





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** गेल्या दोन दिवसापासून बुलढाणा जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अचानकपणे जगप्रसिद्ध असलेल्या लोणार सरोवराची पाणी पातळी चार फुटाने वाढली आहे. तब्बल दशकभरानंतर एवढी पाणी पातळी वाढल्याचं अभ्यासकांच म्हणणं आहे. परंतु परिसरातील दूषित सांडपाणी देखील या सरोरामध्ये सोडले जात असल्याने पाण्याचा रंग बदलला आहे, त्यामुळे सरोवराची जैवविविधता देखील धोक्यात आली आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने याची दखल घेऊन सांडपाणी नियोजन संदर्भात उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

### उद्या बच्चू कडू यांचं राज्यभर चक्काजाम आंदोलन; शेतकरी कर्जमाफीसाठी बच्चू कडू आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** शेतकरी कर्जमाफी, मच्छीमार आणि मेंढपाळांच्या विविध मागण्यांसाठी बच्चू कडू पुन्हा एकदा आक्रमण झाले या विविध मागण्यासाठी काँगेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, मनसे, या सह अनेक संघटना यांनी सुद्धा शेतकऱ्यांसाठी पाठिंबा दिला असून उद्या राज्यभर मोठ्या प्रमाणात बच्चू कडू चक्काजाम आंदोलन करणार आहे. अचलपूर चांदूर बाजार, अमरावती येथील आंदोलन आटपून बच्चू कडू संभाजीनगर साठी रवाना होणार आहे. त्यामुळे उद्या बच्चू कडू आंदोलन कोणत्या प्रकारे पुढे नेतात याकडे सर्वांचा लक्ष लागल आहे. उद्या सकाळी नऊ वाजल्यापासून बारा वाजेपर्यंत राज्यभर चक्काजाम आंदोलन होणार आहे.

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**बुलडाणा/प्रतिनिधी :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## नागपूरमध्ये धक्कादायक हत्याकांड; भरदिवसा रस्त्यावर ५८ वर्षीय महिलेची हत्या

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर शहर पुन्हा एकदा हादरलं आहे. दुपारच्या सुमारे एका अज्ञात हल्लेखोराने ५८ वर्षीय माया पंसेकर मृतक महिलेची दिवसाढवळ्या निर्घृणपणे धारदार शस्त्राने हत्या केली आहे. प्राथमिक माहिती नुसार ही हत्या कौटुंबिक वादातून झाले असल्याचे समोर येत आहे. यामध्ये रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज मध्ये एक आरोपी असल्याचे पोलीस सांगत आहेत यासोबतच



अधिक तपास या प्रकरणांमध्ये पोलीस करून संपूर्ण माहिती घेत असल्याचे पोलीस उपायुक्त नित्यानंद झा यांनी सांगितले आहे.

## जनसुरक्षा कायदा रद्द करण्यासाठी काँग्रेसकडून निदर्शने, तहसीलदारांना दिले निवेदन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अर्बन नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी जनसुरक्षा कायदा आणल्याचा सरकारचा दावा अत्यंत हास्यास्पद आहे. हा कायदा आतून बाहेरून काळा असून सामान्यांची गळचेपी करणारा आहे त्यामुळे काँग्रेस पक्षाचा सुरुवातीपासूनच त्याला विरोध आहे. सभागृहात सत्ताधारी पक्षाकडे बहुमत असल्याने त्यांनी बहुमताच्या जोरावर रेटून नेत कायदा मंजूर करून घेतलेला आहे. सरकारने कायदा मंजूर करून घेतला असला तरी काँग्रेसचा विरोध कायम राहणार असून हा तत्काळ कायदा रद्द करावा अशी मागणी करीत शेगाव शहर व तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने पक्षनेते रामविजय बुरुंगले आणि ज्ञानेश्वरदादा पातळ यांच्या नेतृत्वात निदर्शने करीत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

पक्षाच्या वतीने जनसुरक्षा कायद्यात विरोधी पक्षांनी काही सुधारणा सुचवल्या होत्या, परंतु त्या शासनाने नाकारल्या. याशिवाय, सुरक्षेसंदर्भातील गुन्ह्यांसाठी आधीपासूनच विविध कायदे अस्तित्वात असल्यामुळे नवीन कायद्याची आवश्यकता भासत नाही. जनसुरक्षा कायदा लोकशाहीविरोधी स्वातंत्र्यावर गदा आणणारा असल्याचा आरोप तहसीलदारांना निवेदन देताना करण्यात आला. हा कायदा लोकशाहीविरोधी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाने केला आहे. तहसीलदारांमार्फत राज्यपालांना निवेदन देण्यात आले.

## स्व.पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न




दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम.एन.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व शुभहस्ते वनस्पतीशास्त्र विभाग तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.महाविद्यालयाच्या वनस्पती शास्त्र उद्यान व उर्वरित परिसरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली.याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.एम.एन.गायकवाड यांनी वृक्षाचे मानवी जीवनातील महत्त्व विशद करून प्रत्येकाने आयुष्यामध्ये किमान एक तरी झाड लावावे असे मत व्यक्त केले. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.के.एम. रंजळकर यांनी कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट करून वृक्षांच्या विविध प्रजातींची माहिती विद्यार्थ्यांना दिली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.केशव कोकाटे यांनी निसर्गाच्या समतोलामध्ये वृक्षांची महत्त्वाची भूमिका राहिलेली असल्याचे मत प्रास्ताविकातून व्यक्त केले.कार्यक्रम प्रसंगी वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. के.एम.रंजळकर,डॉ. केशव कोकाटे यांच्यासह,डॉ.आम्रपाली भगत,डॉ.अमोल आढाव उपस्थित होते. कार्यक्रमासाठी जगदीश बोडखे यांचे सहकार्य लाभले.

## तहसीलदार व जिल्हाधिकारी यांनी केली पूरग्रस्त भागाची पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** काल दिनांक २३ जुलै रोजी वाकद व मोप मंडळातील नुकसान झालेल्या शेती पिकांचे व रस्त्यांची व तुटलेला पुलांची पाहणी करण्याकरिता तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडम ह्या सकाळी सात ते दहा या वेळेत येऊन गेल्या व लगेच मा. जिल्हाधिकारी वाशिम भुवनेश्वरी एस.मॅडम यांच्यासह पुन्हा दुपारी बारा ते तीन वाजेपर्यंत या संपूर्ण भागाचे त्यांनी पाहणी करून प्रत्येक गोष्टीची बारीक सारीक माहिती घेतली वाकद व मोप मंडळातील वाकद, गोहगाव हाडे बाळखेड पिंपरखेड शेलु खडसे या गावात अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याचे प्राथमिक अहवालावरून निदर्शनास आले त्यानुसार आपल्या तालुक्याच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व माननीय जिल्हाधिकारी भुवनेश्वरी एस. यांनी हा दौरा केला यादरम्यान मौजे गोहगाव येथे वाकद येथचन जाण्याकरिता सहा किलोमीटर अंतर असून चांगला रस्ता नाही तसेच गावात पोहोचेपर्यंत वेगवेगळ्या तीन प्रकारचे नाले आहेत लेंडी नाला, खराटी नाला व विद्रुपा नदी या तीन प्रवाहांना ओलांडून गावात जाता येते गावातील शाळेतील विद्यार्थी शेतकरी इत्यादी सर्वांना प्रत्येक वेळेस पाऊस आला की गावाबाहेर पडता येत नाही गावाचा संपर्क तुटतो, त्यामुळे या तीनही नाल्यावरील पूलांची स्थिती, रस्त्याची पाहणी करून व सर्व माहिती घेऊन माननीय जिल्हाधिकारी महोदय यांनी सदर रस्ता व पुलाचे बांधकाम तातडीने करण्यात येईल याबाबत हालचाली सुरू केल्या. गावातील शेतकरी महिला विद्यार्थी यांच्याशी सुसंवाद साधून त्यांना अतिवृष्टी व पूर परिस्थितीमध्ये कोणकोणती काळजी घेतली पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले व आपले प्रश्न तात्काळ निकाली काढले जातील असे आश्वासित केले. त्याचबरोबर बाळखेड येथील नदीवरील पूला संदर्भात विविध यंत्रणांना संपर्क साधुन ताबडतोब पाण्याचा प्रवाह मोकळा करण्यासंदर्भात कारवाई केली तसेच शेती पिकांच्या नुकसानीबाबत आढावा घेऊन योग्य ते सर्वे बाबत निर्देश दिले य वेळी त्यांच्यासोबत निवासी नायब तहसीलदार एस बी जाधव, वाकद मंडळाचे मंडळ अधिकारी ए व्ही लहाने साहेब, तसेच



ताकदचे तलाठी जी जी गरकळ, अक्षय जाधव, तलाठी बाळखेड के एस धांडे, तलाठी वाडी वाकद काष्टे मॅडम तलाठी शेलुखडसे के पी डुकरे गोहगाव व व बाळखेड येथील पोलीस पाटील मिलिंद हाडे सरपंच विकास हाडे ग्रामपंचायतचे कर्मचारी व गावकरी उपस्थित होते,